# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

**फोन नं.(०२०) २६०५०६४१** **ई-मेल आयडी :-** sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/ड वर्ग सं.कृ.का./प्रा.अ./मान्यता/२०१४/8778
दिनांक २५/११/२०१४

प्रति,
जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, वर्धा.

**विषय : 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी निवडणुक निर्णय अधिकारी/ प्राधिकृत अधिकारी यांच्या नेमणुकीस मान्यतेबाबत..**

**संदर्भ :** आपले पत्र यांचे जा.क्र.जिउनि/नियमन/ड संस्था कृती आराखडा/१४ दि.२१/११/२०१४

उपरोक्त संदर्भांकीत विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येऊन कळविणेत येते की,

२/- संदर्भीय प्रस्तावाव्दारे वर्धा जिल्ह्यातील 'ड' वर्गामधील दि.१/४/१३ ते ३१/१०/२०१४ या कालावधीत निवडणुकीस पात्र असलेल्या एकुण ४ सहकारी संस्थाच्या निवडणुकीबाबतच्या कृती कार्यक्रमास मंजुरी मिळणेस्तव प्राधिकरणास विनंती केलेली आहे.

'ड' वर्गातील सहकारी संस्थांचे निवडणुका ह्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७६, महाराष्ट सहकारी संस्था नियम, १९६१ चा नियम ६० मधील तरतुदी अंतर्गत व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) २०१४ मधील नियम ७६ नुसार तसेच संस्थेचे मंजुर उपविधीप्रमाणे पार पाडणे आवश्यक आहे.

सबब त्यास अनुसरुन जिल्ह्यातील दि.१/४/१३ ते ३१/१०/२०१४ या कालावधीत निवडणुकीस पात्र 'ड' वर्गातील एकुण ४ संस्थांचा प्राधिकृत अधिकारी नियुक्तीच्या प्रस्तावात शिफारस केल्याप्रमाणे खालील शर्तीस अधिन राहुन सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मधील त्या त्या संस्थांच्या नावासमोर दर्शविलेल्या व्यक्तिंना प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे. **तसेच उक्त नियुक्त अधिकारी यांनाच त्या त्या संस्थांच्या नियम ७७ नुसार पदाधिकारी निवडीच्या सभेसही प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे.**

१. प्रस्तावात नमुद केलेल्या संस्थांचा प्रस्तावित विशेष साधारण सभेची नोटीस काढण्याचा दिनांक व सभेचा दिनांक (दोन्ही दिवस वगळता) यामध्ये नियम ७६ मधील तरतुदीप्रमाणे १५ दिवसांची मुदत असेल याची दक्षता घ्यावी.
२. गृहनिर्माण सहकारी संस्थांचे अधिमंडळाचे विशेष बैठकीचा दिनांक शक्यतो रविवार असावा.
३. प्राधिकरणाचे दि.१८/१०/२०१४ रोजीचे 'ड' वर्ग संस्थांचे निवडणुकीबाबतचे सर्वसाधारणपर मार्गदर्शन सुचना तालुका सहकारी निवडणुक अधिकारी/ जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यास अवगत कराव्यात.
४. 'ड' वर्गात समाविष्ट नसलेल्या संस्थांच्या निवडणुकीकरता प्राधिकृत अधिकारी नेमता येणार नाहीत असे झाले नाही याची खात्री तालुका सहकारी निवडणुक अधिकाऱ्याने प्राधिकृत अधिकारी यांना अवगत करणेपुर्वीच करावी.
५. प्रमाणित लेखापरीक्षक ज्यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नावे सुचविली आहेत ते नामतालिकेवर असल्याची पुन:श्च खात्री प्राधिकृत अधिकाऱ्याला अवगत करणे पुर्वीच करावी.

**सदरचे नियुक्ती आदेश मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने व निर्देशाप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.**

**सोबत :** परिशिष्ट अ

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत :** माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव संबंधित तालुका सहकारी निवडणुक अधिकारी

# परिशिष्ट अ

## राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाकडील कार्यालयीन पत्र जा.क्र.रासनिप्रा/ड वर्ग सं.कृ.का./प्रा.अ./मान्यता/२०१४ दि. २५/ ११ /२०१४ चे आदेशासोबतचे परिशिष्ट

| अ.क्र. | जिल्हा | तालुक्याचे नाव | संस्थेचे नाव | विशेष साधारण सभेचे प्राधिकृत अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | वर्धा | कारंजा | कुवारा भिमसेन आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था मर्या. लादगड,नोदणी क्रमांक ३३६ ता. कारंजाजिल्हा | श्री.एस.बी.ठाकरे, सहकार अधिकारी, श्रेणी- २ |
| २ | | कारंजा | महाकाली आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था मर्या. मासोद र.न. ११७६ ता.कारंजा जिल्हा वर्धा | श्री. व्ही.बी. किरनाके सहाय्यक सहकार अधिकारी, |
| ३ | | कारंजा | श्री.साईबाबा आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था मर्या. धानोली र. न. - ता. कारंजा जिल्हा वर्धा | श्री.एस.बी.ठाकरे, सहकार अधिकारी, श्रेणी- २ |
| ४ | | सेलु | आदिवासी जंगल कामगार सहकारी संस्था मर्या. बोरी (बोरधरण ) नोंदणी क्रमांक ३०९ ता. सेलु जिल्हा वर्धा | श्री.व्ही.ए.भोयर, सहाय्यक सहकारी अधिकारी |

(डॉ. आनंद जोगदंड)
सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे